दिनांक :

प्रति,

————————————

————————————

**विषय : धर्मादाय आयुक्तांनी देवस्थानांचा निधी चारा छावण्यांसाठी देण्याचा निर्णय रहित करण्याविषयी....**

महोदय,

राज्य सरकार दुष्काळी भागांमध्ये चारा छावण्या उभारणार आहे. त्यासाठी धार्मिक संस्था आणि देवस्थाने यांचा निधी देण्याचा निर्णय राज्य धर्मादाय आयुक्त शिवकुमार डिगे यांनी एका परिपत्रकाद्वारे कळवला आहे. यावर कार्यवाहीसाठी शासनाद्वारे महसूलमंत्री चंद्रकांत पाटील आणि परिवहनमंत्री दिवाकर रावते यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. आतापर्यंत सरकारीकरण केलेल्या मंदिरातून शासनाने अनेकदा भक्तांनी अर्पण केलेले धन विकासासाठी आणि अन्य योजनांसाठी घेतला आहे; पण त्या निधीतून घोटाळे झाल्याचेच समोर आले आहे.

*** या अनुषंगाने लक्षात आलेल्या काही गोष्टी पुढे दिल्या आहेत.**

१. नुकतेच 'श्री साई संस्थान'ने दुष्काळ निवारणासाठी मुख्यमंत्री निधीसाठी ५० कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणी भाविकांचा रोष निर्माण झाल्याने ट्रस्टच्या अध्यक्षांच्या गाडीची मोडतोडही झाल्याची घटना घडली.

२. नोव्हेंबर २००७ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील यांच्या शिर्डी येथील दौऱ्याचा ९३ लाख रुपयांचा खर्च झाला. तसेच नुकतेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवाच्या कार्यक्रमासाठी आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याचा ३ कोटी रुपयांचा खर्च झाला. या दोन्ही वेळेला हा खर्च साई संस्थानकडून घेण्यात आला.

३. वर्ष २०१५ मध्ये 'श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट'ने नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यातील गर्दीच्या नियोजनासाठी पोलिसांच्या मागणीनुसार ६६ लाख ५५ हजार ९९७ रुपयांचे साहित्य खरेदी केले. यामध्ये माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे.

४. नगर जिल्ह्यातील 'निळवंडे धरण आणि कालवा' प्रकल्पासाठी मुख्यमंत्र्यांनी शिर्डी संस्थानच्या निधीमधून ५०० कोटी रुपये संमत केले आहेत.

५. मुंबई येथील श्री सिद्धीविनायक मंदिर ट्रस्ट, शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान आणि अन्य सरकारीकरण केलेल्या मंदिरांमधून शासनाने 'जलयुक्त शिवार योजने'साठी कोट्यवधी रुपये घेतले आहेत.

६. राज्यातील धार्मिक स्थळांकडे कोट्यवधी रुपयांच्या निधीचा उपयोग सामाजिक कामांसाठी व्हावा, असे कारण पुढे करत राज्य धर्मादाय आयुक्तांनी मंदिरातील निधी सामूहिक विवाह सोहळ्यांवर खर्च करण्याचा निर्णय घेतला.

वरील उदाहरणे पहाता राज्य शासन केवळ मंदिरांतील पैशांवर डोळा ठेवून विकासासाठी निधी वापरण्याचे काम करत आहे. प्रत्यक्षात विकास करणे, दुष्काळ निवारण करणे, धरणे बांधणे, पोलिसांसाठी लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करणे आदी कामे शासन आणि प्रशासन यांची आहेत. राज्याला निधीची आवश्यकता पडल्यास केंद्र शासनाकडेही निधीची मागणी करता येते.

७. सरकारीकरण झालेल्या मंदिरांच्या शासकीय विश्वस्तांनी बेधुंद कारभार करून तेथे कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड होऊनही त्यासाठी केवळ 'चौकशांचे फार्स' चालू आहेत; पण देवधनाची लूट करणारे मोकाटच आहेत. याविषयी शासन ठोस पावले उचलत नाही; मात्र निधीसाठी तत्काळ निर्णय घेतले जातात. हे अनाकलनीय आहे. देवधनाची लूट करणाऱ्यांना तत्काळ शिक्षा होणे अभिप्रेत असतांना शासन जणू त्यांना पाठीशी घालत असल्यासारखे वागतांना दिसत आहे.

८. मंदिरात भाविकांनी दिलेल्या दानाचा उपयोग धर्मकार्य, मंदिरातील धार्मिक विधी, मंदिराचे पावित्र्यरक्षण, मंदिरातील भाविकांची व्यवस्था, मंदिरांचे महत्त्व आणि धर्माचा प्रसार आदींसाठी व्हायला हवा; पण तसे न होता या निधीतून मुसलमान आणि ख्रिस्ती पंथीय लोकांना साहाय्य करण्यात आल्याचेही माहिती अधिकारातून स्पष्ट झाले आहे. प्रत्यक्षात धर्मनिरपेक्ष शासनाने धर्माशी निगडीत गोष्टींत हस्तक्षेप करणे अयोग्य आहे आणि जर केलाच तर मग सर्वच

धर्मांशी निगडित प्रार्थनास्थळे, त्यांचे निधी, त्यांच्या परंपरा यांमध्येही तो व्हायला हवा; मात्र दुर्दैवाने असे होतांना दिसत नाही. परिणामी हिंदूंमध्ये रोष उत्पन्न होऊन भेदभावाची आणि अन्यायाची भावना निर्माण झाली आहे.

९. शासन अनेक श्रीमंत मंदिरांतील पैसा शासकीय योजनांसाठी वापरत आहे; मात्र याच वेळी आर्थिक उत्पन्न कमी वा अत्यल्प असलेल्या मंदिरांकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात आहे. मंदिरांतील निधी अन्य मंदिरांच्या विकासासाठी वापरला जात नाही, तोच मशिदी आणि चर्च यांच्यासाठी वापरला जातो, हे अत्यंत निषेधार्ह आहे.

१०. मंदिर सरकारीकरणामुळे पवित्र मंदिरांचा कारभार हा भ्रष्ट शासकीय समित्यांकडे गेला आहे. मंदिरांतील धन हा देवनिधी असून यामध्ये भ्रष्टाचार करणे, धन लुटणे वा त्या धनाचा योग्य प्रकारे विनियोग न करणारे, हे महापाप आहे.

११. काँग्रेसचे शासन असतांना चारा छावणी प्रकरणी अनुमाने २०० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. ‘या प्रकरणी कारवाई करण्यास शासन उदासीन आहे’, असे ताशेरे न्यायालयाने ओढले आहेत. त्यावर ६ सप्टेंबर २०१७ या दिवशी ‘चारा छावणीतील भ्रष्टाचारावर कारवाई करण्यात येईल’, असे न्यायालयात प्रतिज्ञापत्र राज्य सरकारने देऊन कारवाई करण्याचे संकेत दिले; पण अद्यापपर्यंत काहीही कारवाई केलेली नाही. आता यासाठी देवस्थानचा पैसा या भ्रष्टाचाराच्या दलदलीत टाकण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

*** या प्रकरणी आम्ही शासनाकडे पुढील मागण्या करत आहोत –**

१. मंदिरांमध्ये हिंदु भाविक समाजकार्यासाठी नव्हे, तर देवकार्यासाठी म्हणजेच धर्मकार्यासाठी धन अर्पण करतात. त्यामुळे मंदिरांचा निधी धर्मकार्यासाठीच वापरला गेला पाहिजे.

२. धर्मनिरपेक्षतेचा डांगोरा पिटणाऱ्या शासनाने आणि धर्मादाय आयुक्तांनी सर्वधर्मियांच्या प्रार्थनास्थळांकडून म्हणजेच चर्च, मशिदी, बौद्ध मंदिरे आदींकडूनही शासकीय योजनांसाठी निधी घ्यावा.

३. सरकारीकरण झालेल्या सर्व मंदिरांमधील गैरकारभाराची सखोल चौकशी करण्यासाठी शासनाने कालबद्ध न्यायालयीन चौकशी समिती नियुक्त करावी, मंदिरांचे धन अशा प्रकारे लुटले जात आहे, याबाबत भाविकांमध्ये प्रचंड रोष आहे. जर हे असेच चालू राहिले, तर शासनाला हिंदूंच्या रोषाला सामोरे जावे लागेल. त्यामुळे विविध मंदिरांतील घोटाळ्यांना उत्तरदायी असणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी.

४. जोपर्यंत मंदिरांतील भ्रष्टाचाराच्या प्रकरणांतील दोषींना शिक्षा होत नाही, तोवर मंदिरांच्या निधीला हात लावू नये.

५. वर्ष २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात चारा छावणी प्रकरणी जो भ्रष्टाचार झाला, त्यातील भ्रष्टाचाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी.

६. शासनाने चारा छावण्यांसाठी मंदिरांचा निधी देण्याविषयी घेतलेला निर्णय तात्काळ रहित करावा.

७. शासनाने सरकारीकरण केलेली सर्व मंदिरे भक्तांच्या स्वाधीन करावीत.

आपला विश्वासू,

संपर्क :